उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात येणा-या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

संशोधक

राठोड रमेश बाबूराव

सुदर्शन माध्यमिक आश्रमशाळा, सत्तरधरवाडी

ता. औसा जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. लिगाडे ओमशिवा विश्वनाथ

(एम. ए., एम. फिल., पीएच.डी.)

इतिहास विभाग प्रमुख

शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

ता. चाकूर जि. लातूर

एप्रिल, २०१९

1 प्रस्तावना :

उस्मानाबाद हे दक्षिण भारतातील प्राचीन काळातील महत्वपूर्ण असे शहर आहे. प्राचीन काळातील प्रसिद्ध घराणे ‘सातवाहन’ यांच्या काळात ‘तेर’ (तगर) हे प्रमुख बाजारपेठेचे ठिकाण होते. याच क्षेत्रामध्ये अनेक भटक्या जमातीचे लोक देखील बाजारानिमित्य येत असे. येथून परदेशात मोठा व्यापार चालत असे. रेशीमचे उत्पादन करणारे प्रमुख ठिकाण म्हणून तेरला ओळखत असत. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये भटके विमुक्त समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येते.

प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक काळातील राजकीय घडामोडीचा परिणाम प्राचीन ‘धाराशिव’ म्हणजेच आजचे उस्मानाबाद या जिल्ह्यावर पडला. सातवाहन, यादव, बहामनीनंतर भोसले घराणे व निजाम राजवट अशा पद्धतीने उस्मानाबाद शहराचे राजकीय हस्तांतरण होत गेले. तसेच यांच्या राजकीय घडामोडीचाही उस्मानाबाद जिल्ह्यावर परिणाम झाला.

महाराष्ट्रात बंजारा ही जमात मोठ्या प्रमाणात आढळून येते. संशोधन अभ्यासासाठी निवडलेली विषय हा उस्मानाबाद जिल्ह्यापुरताच मर्यादित आहे. उस्मानाबाद हा मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक व धार्मिक सामाजिक वारसा असलेला जिल्हा मानला जातो. या जिल्ह्यात बंजारा समाजाचे लोक माठ्या प्रमाणात आहेत. या बंजारा समाजावर संशोधन करून त्यांच्या परिस्थितीचा आढावा प्रस्तुत संशोधनात घेऊन त्यांच्या लोकजीवनाचा अभ्यास करण्याचा हा माझा प्रयत्न आहे.

2 विषय निवड :

‘‘उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीचा अभ्यास’’ यासाठी बंजारा समाजाच्या

सांस्कृतिक अभ्यास हा संशोधनाचा विषय निवडण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत ठरली. या जमातीची स्वतःची स्वतंत्र अशी संस्कृती आहे. त्यांची वस्तीस्थाने वेगळे आहे. राहणीमान वेगळे आहे. त्यांची बोली भाषा ही इतर बोली भाषेपेक्षा वेगळी आहे. त्यांची जीवन जगण्याची पद्धती इतर जमाती पेक्षा वेगळी आहे. अशा या वैशिष्ट्यपूर्ण समाजाचे लोकजीवन मी स्वतःअतिशय जवळून अनुभवले आहे आणि मी त्याच समाजात जन्मलो असल्याने या जमातीचे अनेक पैलूंविषयी ऐतिहासिक असे लेखन या जमातीच्या लोकजीवनावर झालेले नाही. म्हणून हा विषय सदरील संशोधनासाठी निवडलेला आहे.

3 संशोधन विषयाची पार्श्वभूमी :

इतिहासाच्या जडणघडणीत समाजातील प्रत्येक घटकाचा वाटा असतो. प्रत्येक स्तरातील व्यक्ती, घटना यांच्या माध्यमातून स्थल, काल व सापेक्ष इतिहास घडत असतो. स्थानिक प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय व संस्कृतीच्या इतिहासाची वलये आकार घेतात. प्रादेशिक इतिहासांच्या वलयातूनच राष्ट्रीय एकीभूत इतिहास साकार होत असतो. म्हणनूच स्वतंत्र भारताच्या इतिहासाला समजून घेण्यासाठी देशातील विविध धर्मांचे, जातीचे, जमातीचे, वंशाचे व विविध भाषा बोलणा-या लोकांचा इतिहास देखील समजून घेतला पाहिजे.

महाराष्ट्राला इतिहासाची भक्कम व प्राचीन परंपरा आहे. आचार्य अन्नेच्या शब्दांत महराष्ट्राला इतिहास आहे. इतर प्रातांना फक्त भुगोल आहे. इतिहास माणसाला शहाणा करतो असे बेकनहा विद्वान मानत असे. या सर्व मतांच्या आधारे महाराष्ट्रात राहणा-या अनेक जाती जमातींचे, वंशाचे व विविध भाषांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. महराष्ट्र या भू-प्रदेशात इतिहास म्हणजे मातृभाषा असलेल्या

लोकांचा इतिहास होय. आज इतिहास म्हणजे राजकीय नसून सामाजिक, सांस्कृतिक अंगोपागांनी बहरलेल्या व्यापक जीवनाची मांडणी होय.

महाराष्ट्रात अनेक जाती धर्माचे लोक राहतात. त्यातील एक जमात म्हणजे बंजारा होय. आर्यकालीन समाजरचना वर्णावर आधारित होती. या वर्णव्यवस्थेचे रूपांतर जाती व्यवस्थेत झाले व अनेक जाती निर्माण झाल्या त्यापैकी बंजारा ही एक जमात होय. बंजारा जमातीचे लोक कष्टाळू, लढाऊ, कुटनितिज्ञ माणले जातात. या जमाती विषयीचे अनेक संदर्भ प्राचीन सिंधु संस्कृतीच्या इतिहासात पाहावयास मिळतात. बंजारा लोक व्यापारी होते हे सिद्ध होते.

कारण ते बैलाच्या व गाईच्या पाठीवरून अन्नधान्यांनी भरलेल्या गोण्या लादून तो माल सर्व भारतभर पोहचवणारी जमात मानली जाते. भारतीय स्वातंत्र्य लढयात या जमातीने क्रांतीकारी चळवळीतून आपला सहभाग नोंदवल्याचा पुरावे इतिहासात सापडतात. भारताला स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या जमातीवरील गुन्हेगार जमात हा कायदा रद्द करून जमातीला विमुक्त केले. ही जमात भारतातील जवळपास 'तेरा प्रातांत तांडे करून वास्तव्यास असलेली दिसून येते.

4 संशोधनाची गरज व महत्व :

प्रस्तुत अभ्यास अनेक अंगानी महत्त्वाचा असून त्यातील काही पैलू खालील प्रमाणे आहेत.

1) इतिहासाच्या जडणघडणीत अनेक भटक्या जमातीचे महत्त्वपूर्ण असे योगदान आहे. त्या जमातीपैकीच बंजारा ही एक जमात आहे. त्याचे इतिहासातील कार्य स्पष्ट होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत अभ्यास महत्त्वाचा ठरेल.

2) बंजारा जमातीची स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण अशी संस्कृती आहे ती काळाच्या ओघात आज लोप पावत चालली आहे, त्यादृष्टीने प्रस्तुत संशोधन ऐतिहासिक दस्तावेज म्हणून महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

3) सिंधू संस्कृतीशी नाते असणा-या या जामातीच्या अभ्यासाने ऐतिहासिक तथ्यावर प्रकाश पडणार आहे. या दृष्टीने ही हा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

4) आदिवासी जमातीपैकी बंजारा ही एक जमात असून त्यांच्या रूढी, प्रथा-परंपरा, अंधश्रध्दा, सण, उत्सव, रितीरिवाज, देवी-देवता व भाषा यांच्यावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीनेही प्रस्तुत संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे.

5) उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा जमातीचे सध्याचे जीवन कसे आहे या दृष्टीने ही प्रस्तुत अभ्यास महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

5 संशोधनाची उद्दिष्टये :

प्रस्तुत संशोधन विषयासाठी पुढील प्रमाणे उद्दिष्टये ठरविण्यात येतील.

1) उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

2) उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजातील लोकांचे सामाजिक व आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे.

3) उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजातील लोकांचे धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे.

4) उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.

6 संशोधनाची गृहीतके :

प्रस्तुत संशोधन समस्येच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

1) उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजातील लोकांच्या जीवनावर सामाजिक व आर्थिक स्तराचा सकारात्मक परिणाम दिसून येतो.

2) उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजातील प्रचलित प्रथा, परंपरेचा धार्मिक व सांस्कृतिक स्थितीवर सकारात्मक परिणाम झालेला आहे.

3) उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजाचे राजकीय प्रतिनिधित्व करणा-या व्यक्तींचे बंजारा समाजातील विविध घटकांवर सकारात्मक परिणाम दिसून येतो.

7 संशोधनाच्या मर्यादा व व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन अभ्यासाच्या मर्यादा खालील प्रमाणे आहेत-

1) प्रस्तुत संशोधन हे उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजापुरतेच मर्यादित असेल.

2) प्रस्तुत संशोधन हे उस्मानाबाद जिल्ह्यातील बंजारा समाजाचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय स्थितीपुरतेच मर्यादित असेल.

3) सिंधू संस्कृतीचा इतिहास अस्पष्ट असल्याने लोककला यावर आधारित संशोधन केले जाणार आहे ही एक या संशोधनाची समस्या आहे.

4) बंजारा समाजातील लोकांचा अशिक्षित व निरक्षरता ही या संशोधन कार्य करताना येणारी आहे.

5) प्रस्तुत संशोधनाचा विषय एम. फिल पदवीसाठी केलेल्या संशोधन विषयाची व्याप्ती वाढवून पीएच.डी. पदवीच्या संशोधनासाठी निवडलेला आहे.

6) उस्मानाबाद जिल्ह्यात बंजारा समाजाचे अनेक तांडे (वस्त्या) असल्याने त्यातील निवडक तांड्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

8 **संशोधन अभ्यासाची पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील पद्धतीचा अवलंब केला जाईल. तसेच संशोधनाची उद्दिष्टे, माहिती संकलनाची तंत्र, साधने, क्षेत्र, नियंत्रण तंत्र इत्यादी अनेक प्रकारच्या आधारावर शैक्षणिक संशोधन पद्धतीचे चार प्रकारात वर्गीकरण करता येते. अ) ऐतिहासिक संशोधन पद्धती, ब) प्रायोगिक संशोधन पद्धती, क) वर्णनात्मक संशोधन पद्धती व ड) सर्वेक्षण संशोधन पद्धती इ. आहेत.

1) संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित-अप्रकाशित ग्रंथाचा संदर्भ म्हणून वापर करण्यात येईल.

2) जमातीचा अभ्यास असल्या कारणाने अनुसूची पद्धतीचा वापर केला.

3) आवश्यक त्या ठिकाणी मुलाखती घेण्यात येतील.

4) आवश्यक त्यावेळी सर्वेक्षण पद्धतीचा ही अवलंब केला जाईल.

5) आदी पद्धतींचा संशोधनात वापर केला जाणार आहे.

9 संशोधन अभ्यासाची साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला जाईल. प्राथमिक साधनात बंजारा जमातीतील राजकीय नेते कार्यकर्ते पदाधिकारी, नाईक, कारभारी, महिला वर्ग इ. कडून मुलाखतीद्वारे ही माहिती मिळवण्यात येईल, तर दुय्यम साधनांत विविध जमातीच्या संघटनांचे अहवाल, नियतकालिके, मासिक, आदिवासी समाजावर प्रकाश टाकणा-या लेखकांचे प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ, लेख, वृत्तपत्रे, साप्ताहिके, शासकीय अहवाल व कागदपत्रे, जिल्हा गॅझेटिअर्स आदी साधनांचा वापर केला जाईल.

10 प्रकरण योजना :

1. प्रकरण पहिले - ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

प्रस्तुत संशोधनामध्ये उस्मानाबाद जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, व भौगोलिक पार्श्वभूमी थोडक्यात स्पष्ट करण्यात येणार आहे. यामध्ये थोडक्यात इतिहास, राजकीय स्थित्यंततरे, स्थान, पिके, मृदा, नद्या, बंजारा समाजाच्या वस्त्या इत्यादी मुद्याच्या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार आहे.

2. **प्रकरण दुसरे - संदर्भीत पूर्व साहित्याचा आढावा व संशोधन पद्धती**

या प्रकरणामध्ये बंजारा जमातीवर आधारित विविध संदर्भ साहित्याचा व संशोधनाचा मागोवा या प्रकरणात घेण्यात येईल. यासाठी विविध ग्रंथ, नियतकालिके, गॅझेटियर्स, संशोधन पत्रिका, मासिके, विविध संशोधन लेख,

लघु शोधप्रबंध, पीएच.डी. शोधप्रबंध इत्यादी साधन सामुग्रीचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

3. **प्रकरण तिसरे - बंजारा समाजाचे सामाजिक व धार्मिक जीवन**

या प्रकरणामध्ये बंजारा समाजातील रूढी, परंपरा, राहणीमान, आचार-विचार, आहार, पोशाख, वंशावली, भाषाशैली, सण, उत्सव, देवी देवता, धार्मिक समजूती, प्रार्थना, संस्कार, भाषा इत्यादी सामाजिक व धार्मिक बाबींचा समावेश असेल.

4. **प्रकरण चौथे - बंजारा समाजाचे आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय स्थिती**

या प्रकरणामध्ये राजकीय प्रणाली, राजकीय दारसा टोळी, राज्ये चळवळीतील सहभाग राजकीय स्थैर्य, व्यापार, व्यवहार व व्यवसाय आदी बाबींचा आढावा या प्रकरणात असेल. तसेच बंजारा समाजाची संस्कृतीची जडणघडण, शिक्षण, लोकगीते, लोककला, स्थापत्य, आभूषण, कलाकुसरीच्या पद्धती आदी बाबींचा समावेश या प्रकरणात असेल.

5. **प्रकरण पाचवे - उपसंहार, निष्कर्ष व शिफारशी**

वरीलप्रमाणे प्रकरणाच्या अभ्यासातून प्राप्त झालेले निष्कर्ष या प्रकरणामध्ये मांडले जातील आणि निष्कर्षावर आधारित बंजारा जमातीसाठी योग्य त्या शिफारशीसाठी केल्या जातील.

संदर्भग्रंथ सूची

1. आगलावे प्रदीप (2000): संशोंधन पद्धतीशास्त्र व तंत्रे नागपूर, विद्या प्रकाशन, औरंगाबाद, पृ. 214-215
2. आपटे, महादेव (१९६२)- 'लिंग्विस्टिक अकल्चरेशन अँड इट्स रिलेशन टु अर्बनायजेशन अँड सोशिओ-इकनॉमिक फॅक्टर्ज,' इंडियन लिंग्विस्टिक्स, २३ : ५-२५
3. कुलकर्णी, सोनल (२००१)- सोशिओलिंग्विस्टिक वेरिएशन इन अर्बन इंडिया : अ स्टडी ऑफ मराठी स्पीकिंग ॲडलसंट्स इन पुणे, अप्रकाशित शोधप्रबंध, युनिव्हर्सिटी ऑफ रेडिंग, इंग्लंड.
4. कुलकर्णी-जोशी, सोनल (२००७-०८)- 'रीव्हिजिटिंग कुपवाड : दि अर्गोटिव कंस्ट्रक्शन इन मराठी द्रविडियन कॉन्टॅक्ट अँड कन्व्हर्जन्स' बुलेटिन ऑफ द डेक्कन कॉलेज.
5. कोंडेकर ए. वाय. भारतीय समाज आणि सामाजिक समस्या.
6. खैरनार दिलीप: सामाजिक संशोधन पद्धती, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र. 145
7. ग. ह. राठोड – बंजारा दोहावली व सत्यशोधकी मराठी अभंग.
8. गर्गे स. मा. (संपा), भारतीय समाजविज्ञान कोश.
9. चेंबर्स, जॅक. (१९९७)- सोशिओलिंग्विस्टिक थिअरी, ब्लॅकवेल : ऑक्स्फोर्ड
10. चेंबर्स, जॅक; पीटर ट्रडगिल; नॅटली शिलिंग-एस्टेस, (संपादक) (२००४)- अ हँडबुक ऑफ लँग्वेज व्हेअरिएशन अँड चेंज, ब्लॅकवेल : ऑक्सफोर्ड
11. जोशी, महादेवशास्त्री (संपा), भारतीय संस्कृती कोश
12. डॉ. मोहन लक्ष्मणराव चव्हाण बंजारा भाषा एक अधयन
13. डॉ. रूक्मिणी पवार, बंजारा लोकजीवन पद्धती, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.
14. डॉ. लीनकुमार बावने, भटक्यांचा भग्न संस्कार आणि संस्कृती (१९९२)

15.डॉ. सुभाष राठोड – बंजारा स्त्री लोकगीत : एक अध्ययन.

16.धोंगडे, रमेश (२००६)- सामाजिक भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

17.पंडित नलिनी : धर्म, शासन आणि समाज.

18.प्र. रा. देशमुख : सिंधु संस्कृती ऋग्वेद व हिंदू संस्कृती : प्राज्ञपाठशाळा मंडळ वाई (१९६६)

19.मोतीराज राठोड – गोरमाटी

20.प्रा. मोतीराज राठोड गोर-बंजारा वंशाचा इतिहास (२००५).

21.बर्न्सन, मॅक्सीन (१९७८)-'सोशल स्ट्रॅटिफिकेशन इन द मराठी स्पीच ऑफ फलटण'. इंडियन लिंग्विस्टिक्स : ३९:२३३-५१.

22.ब्राइट, विलियम (१९६०)- 'अ केस स्टडी ऑफ कास्ट अँड डायलेक्ट इन मैसूर,' इंडियन लिंग्विस्टिक्स. २१:४५-५०

23.ब्राइट, विलियम; ए.के. रामानुजन (१९६४)-'सोशिओलिंग्विस्टिक व्हेअरिएशन अँड लँग्वेज चेंज', समाविष्ट जे.बी.प्राईड आणि जेहोम्ज् (संपादक), सोशिओलिंग्विस्टिक्स, पेंग्विन, मिडलसेक्स : इंग्लंड. पृ.१५७-१६६.

24.भांडारकर पु. ल. (1977)- सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर

25.भिंताडे वि. (2007): शैक्षणिक संशोधन पद्धती, नृत्य नूतन प्रकाशन, पुणे, रा. पृ. 88

26.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

27.सरदार गं.बा. (संपा) महाराष्ट्र जीवन.

28.साळुंके सर्जेराव (2006)- समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे, पृ.क्र. 2

29.साळुंके सर्जेराव (2006): समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे, पृ.क्र. 2

30.हरिभाऊ राठोड लमान-बंजारा आणि वंजारी (१९९४)

31. **Deshmukh Pradeep & Shiledar Pravin (2007)-** Research Methodology in Physical Education, Nirmal Prakashan, Nanded

32. **Oxford Advance Learners Dictionary (**1995**):** Oxford University Press

33. **Thakur, Devendra (**1996**)-**Research Methodology, New Delhi, Deep and Deep Publication

संशोधक

राठोड रमेश बाबूराव
सुदर्शन माध्यमिक आश्रमशाळा,
सत्तरधरवाडी
ता. औसा जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. लिगाडे ओमशिवा विश्वनाथ
(एम. ए., एम. फिल., पीएच.डी.)
इतिहास विभाग प्रमुख
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर जि. लातूर